महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:-डब्ल्यूईबी-१०२०/सीआर-२६/२०२१/मा.तं. दिनांक:- २५ जानेवारी, २०२२

## -: प्रसिध्दीपत्रक:-

**विषय:- मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा २०२०-पोलीस उपनिरीक्षक करीता ८६ उमेदवारांनी अर्ज सादर करण्याबाबत**

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२० च्या उत्तरतालिकेसंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्रमांक ५७१/२०२२ प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिनांक २४ जानेवारी, २०२२ रोजीच्या आदेशान्वये याचिकाकर्त्या ८६ उमेदवारांना दिनांक २९ व ३० जानेवारी, २०२२ रोजी आयोजित परीक्षेसाठी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल मूळ अर्ज क्रमांक १०५६/२०२१ प्रकरणी होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात प्रवेश देण्याचे निर्देश दिले आहेत.

२. मा. उच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने सदर ८६ उमेदवारांचे अर्ज आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीद्वारे स्वीकारण्याची व्यवस्था आयोगाकडून करण्यात आली असून अर्ज सादर करण्यासंदर्भात उमेदवारांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे:-

(१) अर्ज सादर करण्याचा कालावधी:- दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी १८.०० वाजल्यापासून दिनांक २७ जानेवारी, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.

(२) ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरण्यासाठी विहित अंतिम:- दिनांक २७ जानेवारी, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत

(३) अर्ज व परीक्षा शुल्काचा भरणा केवळ ऑनलाईन पध्दतीने करणे आवश्यक असेल.

३. उपरोक्त ८६ उमेदवारांनी अर्ज सादर करण्याची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर त्यांना मुंबई जिल्हाकेंद्रावरील सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, बी रोड, चर्चगेट, मुंबई या उपकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. प्रवेशाच्या अनुषंगाने सदर उमेदवारांना दिनांक २८ जानेवारी, २०२२ रोजी प्रवेशप्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्यात येतील.

४. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार याचिकाकर्त्या ८६ उमेदवारांना निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात प्रवेश देण्यात येत असून सदर उमेदवारांच्या निकालप्रक्रियेसंदर्भातील कार्यवाही मा. प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांच्या अंतिम निर्णयानुसार करण्यात येईल.

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग